| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूटीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/६/कावि/१४५३/२०१०, दिनांक - १४/१२/२०१० |
| विषय | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक यांचे राहत्या निवासी घरांना करात सुट देणेबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख |
| संदर्भ | कर/मुख्य/६/कावि/१७६९/२०१०, दिनांक - ३०/०३/२०१० |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.
करआकारणी व करसंकलन विभाग

**सुधारित परिपत्रक**

मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ७४१ दिनांक २१/१२/२००९ अन्वये माजी सैनिकांचे रहात्या निवासी घरांना सामान्य करात सूटीबाबत धोरण ठरविले आहे. माजी सैनिकांचे राहत्या निवासी घरांना सामान्य करात सूट देणेबाबत संदर्भीय परिपत्रक निर्गत करणेत आले आहे. मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक १००२ दिनांक २०/१०/२०१० अन्वये सुधारित ठराव मंजूर केला आहे. त्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गत करणेत येत आहेत.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक व शासनाचे सन्मानपत्र असलेल्या किंवा जिल्हाधिकारी यांनी प्रमाणपत्र दिलेल्या स्वातंत्र सैनिक यांचे रहात्या निवासी घरास चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील मालमत्ता करातील सामान्य करात ५०% सुट दिनांक १/४/२००९ पासून लागू राहील.

२) सदर सामान्य करातील सूटीचा लाभ माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांची पत्नी हयात असेपर्यंत व हयात नसल्यास त्यांची अज्ञान मुले असल्यास त्यांचे या अज्ञान मुलांपैकी एक मुलगा सज्ञान होईपर्यंत अनुदेय राहील.

३) महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या त्यांच्या राहत्या निवासी घरास सदर सामान्य करातील सूट अनुदेय राहील.

४) बिगरनिवासी वापरासाठी असलेल्या मालमत्तेवरील मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय असणार नाही.

५) १५०० चौ.फुट अथवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे रहाते निवासी घरास फक्त अशी सूट अनुज्ञेय राहील.

६) या सवलतीचा फायदा घेण्यासाठी संबंधित माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांच्या पत्नी यांना दरवर्षी बँक / नगरसेवक यांचा हयातीचा दाखला सादर करावा लागेल. तसेच अज्ञान मुले असल्यास त्यांना वयाचा पुरावा सादर करावा लागेल.

७) सदर सवलतीचा लाभ हा फक्त त्यांच्या एकाच राहत्या निवासी घरासाठी लागू असेल. तसेच संबंधितास रूपये १००/- चे स्टँप पेपरवर "अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नाहीत" असे हमीपत्र प्रथमतः सवलतीस पात्र ठरविणेचे वेळी फक्त एकदाच सादर करावे लागेल.

८) माजी सैनिकांचे घराबाबत माजी सैनिकांना "डिस्चार्ज सर्टिफीकेट" तसेच "पेन्शन पेमेंट ऑर्डर" आणि "ओळखपत्र" ही कागदपत्रे महापालिकेकडे सादर करावी लागतील.

९) स्वातंत्र्य सैनिकांचे घराबाबत संबंधितास शासनाचे सन्मानपत्र असलेस किंवा जिल्हाधिकारी यांनी प्रमाणपत्र दिले असल्यास त्याची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल.

१०) ज्या माजी सैनिकांना पेन्शन अनुज्ञेय आहे अशाच माजी सैनिकंना मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय राहील.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रति,
१) सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय
२) प्रशासन अधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत :
१) सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क,
२) मुख्य लेखापरिक्षण विभाग
३) लेखा विभाग